**<u>नि.दिवाणी दावा क्रं.९७/२०१६</u>**
**<u>नि. क्रं.५६</u>**

**<u>:: वादी पक्षातर्फे विधीज्ञ श्री. एस.एस. देशमुख यांनी ज्यादा सरतपास घ्यायचे नाही असे सांगितले. सबब त्याची नोंद घेतली.</u>**

**<u>:: प्रतिवादी क्र.१ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एस.बी. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरू. ::</u>**

०६. माझे शिक्षण इयत्ता ७ वी पर्यंत झाले. माझ्या आजोळची ७० एकर जमीन होती. मी त्यानंतर ८० एकर जमीन विकत घेतलेली आहे. वादीकडे अंदाजे ५० ते ६० एकर जमीन असेल. हे म्हणणे खरे आहे की, वादीची सर्वे क्र.१३७ मध्ये १२ हे. ३१ आर जमीन आहे. प्रतिवादी क्र.३ हा माझा मोठा मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीकडून वर्ष १९८७ मध्ये प्रतिवादी क्र.३ च्या नावे ७ एकर जमीन विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिनीचे खरेदीखत प्रतिवादी क्र.३ च्या नावे झाले होते. वादीने सर्वे क्र.१३७ मधील ३ एकर जमीन प्रशांत कल्याणकर वलांडे यांना विकली हे मला माहीत नाही. वादीने सर्वे क्र.१३७ मधील ४ एकर जमीन प्रदीप कल्याणकर दवणहिप्परगे यांना विकली हे मला माहीत नाही. वादीने सर्वे क्र.१३७ मधील ३ एकर जमीन बाबुराव दिगंबर सगर यांना विकली हे मला माहीत नाही. वादीने सर्वे क्र.१३७ मधील ५ एकर जमीन त्यांचा मुलगा रामचंद्र यांना दिली हे मला माहीत नाही.

०७. वर्ष १९७८ मध्ये वादीचा काय व्यवहार झाला होता हे मला माहीत नाही. वादीकडून प्रतिवादी क्र.३ करिता जमीन खरेदी करताना ठरावपत्र केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ च्या खरेदीपत्राला मी हजर नव्हतो. प्रतिवादी क्र.३ हा सध्या ६० वर्षाचा आहे आणि तो स्वत:चा व्यापार आणि शेती करतो. वर्ष १९९४ मध्ये नाममात्र खरेदीपत्र केल्याचा व्यवहार झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, वर्ष १९८७ मध्ये वादीला पैशाची गरज होती. हे म्हणणे खरे आहे की, वादीने माझ्या मुलाच्या नावे खरेदीपत्र लिहून दिले होते.

प्रश्न – तुमच्या मुलाने वर्ष १९९४ मध्ये सदर जमीन प्रतिवादी क्र.१ ला ५३ हजार मध्ये विकली आणि त्याचे खरेदीपत्र करून दिले याबाबत तुम्हाला काय सांगायचे ?

उत्तर – वादीने १० हजार रुपये परत दिले नव्हते म्हणून वादीच्या सांगण्यावरून सदर जमीन प्रतिवादी क्र.१ ला खरेदी दिली. त्यामधून १० हजार रुपये आम्हाला मिळाले आणि उर्वरीत रक्कम वादीने घेतली.

०८. मी वर्ष १९९४ मध्ये प्रतिवादी क्र.१ च्या खरेदीपत्राला हजर नव्हतो. मी सदर व्यवहाराच्या बोलणीमध्ये नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीपत्राचा फेरफार झाला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात सदर जमीन आहे. प्रतिवादी क्र.१ हा सदर जमिनीचा मालक झाला हे मला माहीत नाही. प्रतिवादी क्र.१ हा सदर जमिनीची वहिती करतो हे मला माहीत नाही. मी सांगितल्याप्रमाणे माझे साक्ष शपथपत्र लिहिलेले आहे. माझ्या साक्ष शपथपत्रातील परिच्छेद क्र.१ आणि ३ मधील नमूद जमिनीच्या चतु:सिमा या वादीने सांगितल्याप्रमाणे लिहिलेल्या आहेत.

०९. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्ष प्रतिज्ञालेखातील परिच्छेद क्र.१ मधील हातऊसणी रक्कम, नाममात्र खरेदीखत, रक्कम परत केल्यानंतर खरेदीखत परत लिहून देण्याचे ठरले व ईत्यादीबाबत खोटे कथन केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाला ताबा मिळाला नसल्याचे मी खोटे सांगितले. वादीने प्रतिवादी क्र.३चे १० हजार रुपये देण्यासाठी प्रतिवादी क्र.२ कडे ३३ हजार रुपयाची मागणी केली हा मजकूर मला स्वत: माहिति आहे. व्यवहाराच्या चर्चेबाबत मला वादीने सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ च्या नावे नाममात्र खरेदीखत दिल्याचे खोटे सांगितले. रक्कमेवर बँकेचे व्याज घेण्याचे

ठरल्याबाबत वादीने मला सांगितले होते. माझ्यासमक्ष प्रत्येक वर्षी गुढी पाडल्याला ५ हजार रुपये व्याज दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ च्या सांगण्यावरून प्रतिवादी क्र.३ ने प्रतिवादी क्र.१ च्या नावे खरेदीखत करून दिल्याचे खोटे सांगितले.

१०. वादीने प्रतिवादी क्र.२ ला मुद्दल ३३ हजार रुपये वैजनाथ खिंडे व बाबुराव पाटील यांच्या समक्ष परत केल्याचे वादीने मला सांगितले होते. प्रतिवादी क्र.२ ने प्रतिवादी क्र.१ ला दि.१५/१२/२०१५ रोजी पंचांसमक्ष फोन करून खरेदीखत वादीच्या हक्कात करून देण्याचे सांगितले, हे मला वादीने सांगितलेले आहे. रामराव बिरादार यांना वादीने समजावून समीट केले तर जमीन परत करतो असे प्रतिवादीने म्हटल्याचे मला कोणीतरी सांगितले असेल. जमिनीचे खरेदीपत्र करून देण्याबाबत माझ्यासमक्ष लेखी व्यवहार झालेला नाही. पैसे देण्याघेण्याचा व्यवहार माझ्यासमक्ष झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलाने केलेले खरेदीपत्र आणि प्रतिवादींनी केलेले खरेदीपत्र हे कायम खरेदीपत्र होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **<u>देवणी</u>**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **<u>देवणी</u>**.
दि.१३/०३/२०२६.